नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ४ रे Year - 4rd | अंक - १०७ Issue - 107 | वार - शुक्रवार दि. ११ सप्टेंबर २०२६ Blow- Friday Date 11 SEPTEMBER 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

## महाराष्ट्रात पुन्हा पावसाचा जोर; अनेक जिल्ह्यांना यलो अलर्ट !

### वादळी वाऱ्यासह विजांचा हवामान विभागाचा इशारा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : महाराष्ट्रात पावसाने पुन्हा एकदा जोर पकडण्याची शक्यता आहे. भारतीय हवामान विभागाने पुढील काही दिवसांसाठी राज्यातील विविध भागांत वादळी पाऊस, विजांचा कडकडाट आणि सोसाट्याच्या वाऱ्याचा अंदाज व्यक्त केला आहे. ११ ते १४ सप्टेंबरदरम्यान राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये हवामान बदलण्याची शक्यता असून, काही भागांसाठी यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे.

११ सप्टेंबर रोजी नाशिक घाट परिसरासह परभणी, हिंगोली, नांदेड, यवतमाळ, वर्धा, नागपूर, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर आणि गडचिरोली या जिल्ह्यांमध्ये वादळी हवामान आणि विजांचा कडकडाट होण्याची शक्यता आहे. खचऊच्या उपविभागीय अंदाजानुसार मराठवाडा आणि विदर्भात या काळात वादळी पावसाची शक्यता कायम आहे.

१२ सप्टेंबर रोजी कोकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भातील अनेक भागांमध्ये पावसाची शक्यता वाढणार आहे. धुळे, नाशिक, पालघर, ठाणे, मुंबई, रायगड, अहिल्यानगर, छत्रपती संभाजीनगर, जळगाव, बुलढाणा, जालना, बीड, धाराशिव, सोलापूर, लातूर, परभणी, नांदेड, हिंगोली, वाशिम, अकोला, अमरावती, यवतमाळ, वर्धा, नागपूर, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर आणि गडचिरोली या भागांत वादळी पावसाची शक्यता आहे.

मुंबई आणि ठाण्यासाठी आएमडीचे शहरनिहाय अंदाजात १२ सप्टेंबरला विजांसह वादळी वारे येण्याची शक्यता नमूद करण्यात आली आहे. ठाण्यात या दिवशी ३० ते ४० किमी प्रतितास वेगाने झोताचे वारे वाहण्याचा अंदाज आहे.

१३ सप्टेंबर रोजी कोकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भातील अनेक भागांत पावसाची शक्यता आहे. पालघर, ठाणे, मुंबई, रायगड, पुणे, सा-



तारा, रत्नागिरी, नाशिक, अहिल्यानगर, छत्रपती संभाजीनगर, जळगाव, बुलढाणा, जालना, बीड, धाराशिव, परभणी, हिंगोली, वाशिम, अकोला, अमरावती, यवतमाळ आणि वर्धा या भागांत हवामान बदलण्याची शक्यता आहे.

१४ सप्टेंबरला नाशिक घाट, पुणे घाट, पुणे, अहिल्यानगर आणि रत्नागिरी भागात पावसाचा जोर राहण्याची शक्यता आहे. खचऊच्या उपविभागीय अंदाजानुसार कोकण-गोवा आणि मध्य महाराष्ट्रात १३ आणि १४ सप्टेंबरला जोरदार पाऊस, वादळी वारे आणि विजांचा कडकडाट होण्याची शक्यता आहे.

वादळी वारे आणि विजांचा कडकडाट सुरू असताना नागरिकांनी मोकळ्या मैदानात, झाडाखाली किंवा विजेच्या खांबाजवळ उभे राहणे टाळावे. शक्य असल्यास सुरक्षित इमारतीत आसरा घ्यावा. शेतकऱ्यांनीही विजांचा कडकडाट सुरू असताना शेतात काम करणे टाळावे.

दरम्यान, मुंबईसाठी सध्या ११ ते १४ सप्टेंबरदरम्यान शहरनिहाय अंदाजात पावसाची शक्यता असली तरी खचऊच्या मुंबई शहर अंदाजात स्वतंत्र यलो चेतावणी दाखवलेली नाही . त्यामुळे मुंबईसाठी यलो अलर्ट सांगताना जिल्हानिहाय चेतावणी आणि शहरनिहाय अंदाज यातील फरक लक्षात घेणे महत्त्वाचे आहे पुढील काही दिवसांत पावसाचा जोर वाढण्याची शक्यता असल्याने नागरिकांनी आएमडीचे ताजे अपडेट आणि स्थानिक प्रशासनाच्या सूचनांकडे लक्ष ठेवावे.

## कच्च्या तेलाच्या किमतीत पुन्हा मोठी वाढ, पेट्रोल डिझेलचे दर वाढणार?

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : कच्च्या तेलाच्या संदर्भात एक मोठी आणि महत्वाची बातमी समोर आली आहे. आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या किंमतीत पुन्हा एकदा मोठी वाढ झाल्याचे समोर आले आहे. इराण आणि अमेरिका यांच्यातील युद्ध पुन्हा सुरु झाल्याचा थेट परिणाम कच्च्या तेलाच्या किमतींवर झाला आहे. आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाची



किंमत प्रति बॅरल १०५ डॉलरवर पोहोचल्या आहेत. दरम्यान, या कच्च्या तेलाच्या वाढत्या दराचा परीणाम भारतावर काय होणार का? पेट्रोल डिझेलचे दर वाढणार का? असा सवालही उपस्थित केला जात आहे.

होर्मुझची सामुद्रधुनी जगभरातील कच्च्या तेलाच्या आयातीचा स्रोत आहे. भारत हा कच्च्या तेलाचा सर्वात मोठा आयातदार देश असून, त्याच्या कच्च्या तेलाचा एक मोठा हिस्सा याच मार्गाने येतो. त्यामुळे, कच्च्या तेलाच्या किमतीतील कोणत्याही चढ-उताराचा भारतावर थेट परिणाम होतो. फेब्रुवारीच्या अखेरीस युद्ध सुरू झाल्यापासून कच्च्या तेलाच्या किमती सातत्याने वाढत आहेत, मे महिन्यात तर पेट्रोल आणि डिझेलच्या किमतीत सलग चार वेळा वाढ झाली, जी एक मोठी वाढ होती.

जेव्हा कच्च्या तेलाच्या किमती सातत्याने वाढत होत्या आणि कमी होण्याची कोणतीही चिन्हे दिसत नव्हती, तेव्हा मे महिन्यात पेट्रोल आणि डिझेलच्या किमतीत चार वेळा वाढ करण्यात आली. जरी भारत कच्च्या तेलाचा सर्वात मोठा आयातदार देश असला तरी, तो पूर्णपणे एकाच देशावर अवलंबून नाही. अनेक देशांमधून भारतात कच्चे तेल येते, त्यामुळे कोणत्याही एका देशाच्या मार्गावरील अवलंबित्व टाळले जाते.


दरम्यान, कच्च्या तेलाच्या जागतिक किमतींमध्ये झालेल्या वाढीमुळे, भारतातही पेट्रोल आणि डिझेलच्या किमती वाढतील अशी जोरदार चर्चा आहे. ही शक्यता पूर्णपणे नाकारता येत नाही. मात्र, गेल्या काही महिन्यांतील परिस्थिती लक्षात घेता, सरकारनेही तयारी केली आहे. देशाकडे पेट्रोल आणि डिझेलचा पुरेसा साठा आहे, त्यामुळे याचा इंधनाच्या किमतींवर परिणाम होणार नाही अशी शक्यता आहे.

जगभरात कच्च्या तेलाच्या किमती वाढत असताना, तेल कंपन्यांना मोठे नुकसान होत आहे. यामुळे केवळ डॉलरच मजबूत झाला नाही, तर रुपया कमकुवत झाला आहे. आज, भारतीय रुपया ०.२ टक्केने घसरून प्रति डॉलर ९५.३० वर आला, जी जवळपास १० दिवसांतील नीचांकी पातळी आहे.

## १८ वर्षांखालील मुलांसाठी सोशल मीडिया वापरावर निर्बंध? सर्वोच्च न्यायालयात याचिका

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : १८ वर्षांखालील मुलांच्या सोशल मीडिया वापराबाबत सुरक्षेचे कठोर उपाय करण्याची मागणी करणारी याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल झाली आहे. गींीं ठळसहीं षी उहळश्रवीशप श्रश्रळरपलश या संस्थेने दाखल केलेल्या याचिकेवर सर्वोच्च न्यायालयाने गुरुवारी केंद्र सरकारकडून उत्तर मागितले. अल्पवयीन मुलांना सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर अकाऊंट उघडण्यासंदर्भात अधिक प्रभावी नियम आणि सुरक्षाव्यवस्था निर्माण करण्याची मागणी या याचिकेत करण्यात आली आहे.



याचिकाकर्त्यांच्या म्हणण्यानुसार, सध्याच्या माहिती तंत्रज्ञान नियमांमध्ये अल्पवयीन मुलांच्या सोशल मीडिया वापराबाबत पुरेशी स्पष्टता आणि प्रभावी वयोमर्यादा निश्चित केलेली नाही. त्यामुळे १८ वर्षांखालील मुलांना सोशल मीडिया अकाऊंट तयार करण्यापूर्वी पालकांची संमती आवश्यक करावी, तसेच वयाची पडताळणी करण्यासाठी प्रभावी यंत्रणा विकसित करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. अल्पवयीन व्यक्ती सोशल मीडिया प्लॅटफॉर्मसोबत कायदेशीर करार करू शकते का, हा मुद्दाही याचिकेत उपस्थित करण्यात आला आहे.

याचिकेत मुलांच्या डिजिटल सुरक्षेचा मुद्दा केंद्रस्थानी ठेवण्यात आला आहे. सोशल मीडियाच्या अनियंत्रित वापरामुळे ऑनलाइन ग्रूमिंग, सायबरबुलिंग, लैंगिक शोषण, ब्लॅकमेलिंग, वैयक्तिक माहितीचा गैरवापर आणि वयानुसार अयोग्य कंटेंटच्या संपर्कात येण्यासारखे धोके निर्माण होऊ शकतात, अशी चिंता व्यक्त करण्यात आली आहे. त्यामुळे अल्पवयीन मुलांच्या सोशल मीडिया वापरासाठी पालकांची भूमिका आणि अधिक मजबूत सुरक्षा उपाय निश्चित करण्याची मागणी करण्यात आली आहे. मात्र, सध्या १८ वर्षांखालील मुलांना फेसबुक, इन्स्टाग्राम किंवा अन्य सोशल मीडिया प्लॅटफॉर्म वापरण्यावर सर्वोच्च न्यायालयाने कोणतीही बंदी घातलेली नाही. ही याचिकाकर्त्यांची मागणी असून, या प्रकरणात केंद्र सरकारचे उत्तर आल्यानंतर पुढील सुनावणीत त्यावर विचार होणार आहे.

## 'एमपीएससी'च्या जुन्या परीक्षांमधील गुणांचेही 'री-चेकिंग' होणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) परीक्षांमधील कथित गैरप्रकार आणि विद्यार्थ्यांच्या तक्रारींची दखल घेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यापक चौकशी आणि परीक्षा प्रक्रियेत सुधारणा करण्याची घोषणा केली आहे. एमपीएससीच्या जुन्या परीक्षांमधील गुणांचे 'री-चेकिंग', संशयास्पद प्रकरणांची एसआयटीमार्फत चौकशी, ग्रुप बी आणि सीच्या २०२५ पूर्व व मुख्य परीक्षांची तपासणी, तसेच पोलिसांच्या प्राथमिक अहवालाचे प्रकटीकरण करण्याची प्रक्रिया पुढील आठ दिवसांत सुरू करण्यात येईल, असे फडणवीस यांनी गुरुवारी विद्यार्थ्यांशी झालेल्या चर्चेनंतर स्पष्ट केले. गैरप्रकारात अधिकारी, विद्यार्थी किंवा दलाल यापैकी कोणीही सहभागी असल्याचे आढळल्यास त्याला पाठीशी घातले जाणार नाही, असेही त्यांनी सांगितले.

एमपीएससीच्या संदर्भात अलीकडे घडलेल्या घटनांनंतर विद्यार्थ्यांमध्ये निर्माण झालेला उद्रेक योग्य असल्याचे मत फडणवीस यांनी व्यक्त केले. अनेक बाबी दीर्घकाळ साचत गेल्या आणि त्या त्या वेळी आवश्यक असलेल्या सुधारात्मक उपाययोजना झाल्या नाहीत. त्यामुळे परीक्षा व्यवस्थेत अनेक त्रुटी निर्माण झाल्या आहेत. सध्याच्या परिस्थितीचा उपयोग करून या त्रुटी दूर करण्याची संधी मिळाली आहे, असे त्यांनी सांगितले. ड्रग इन्स्पेक्टरच्या परीक्षेतील प्रकरणाचा संदर्भ देताना फडणवीस यांनी सरकारने प्रकरण दडपण्याऐवजी पोलिसांना स्वतंत्रपणे तपास करण्याची मुभा दिल्याचे स्पष्ट केले. पोलिसांचा तपास अद्याप पूर्ण झालेला नसून, प्रकरणातील इतर संबंधित व्यक्तींचा शोध सुरू आहे. त्यामुळे सध्याच्या प्रकरणापुरती कारवाई न करता त्याची 'बॅकवर्ड लिंक' तपासली जाणार आहे. तीन आरोपींच्या संपर्कात असलेल्या उमेदवारांचे कॉल डिटेल रेकॉर्ड (सीडीआर) तपासण्याची प्रक्रिया सुरू असून, त्यातून इतर परीक्षांमधील गैरप्रकारही समोर येण्याची शक्यता असल्याचे फडणवीस यांनी नमूद केले.

विद्यार्थ्यांनी उपस्थित केलेल्या गुणांच्या तक्रारींच्या पार्श्वभूमीवर 'री-चेकिंग' करण्यास सरकारने मान्यता दिली आहे. विद्यार्थ्यांकडून तक्रारी स्वीकारून त्यांची प्राथमिक पडताळणी करण्यात येईल. ज्या प्रकरणांमध्ये प्रथमदर्शनी संशय किंवा अनियमितता दिसून येईल, ती प्रकरणे एसआयटीकडे पाठवून सखोल चौकशी करण्यात येईल. ग्रुप बी २०२५ पूर्व व मुख्य तसेच ग्रुप सी २०२५ पूर्व व मुख्य परीक्षांचीही चौकशी करण्यास सरकार तयार असल्याचे फडणवीस यांनी सांगितले. अभियांत्रिकी, कृषी सेवा आणि एफएसओ परीक्षांमध्ये गुणांबाबत विद्यार्थ्यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांचीही पुन्हा तपासणी करण्यात येणार आहे. या प्रक्रियेपर्यंत संबंधित मुलाखती थांबविण्याच्या सूचना एमपीएससीला देण्यात येतील, असे त्यांनी स्पष्ट केले. परीक्षेच्या उत्तरपत्रिका आरटीआयअंतर्गत विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देण्याची मागणीही योग्य असून, त्यासंदर्भात एमपीएससीला सरकारकडून सूचना करण्यात येतील, असे त्यांनी सांगितले.

एमपीएससीच्या भविष्यातील परीक्षा पद्धतीत सुधारणा करण्यासाठी सामान्य प्रशासन विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिव व्ही. राधा यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली आहे. या समितीत अत्यंत विश्वासार्ह आणि निष्पक्ष प्रतिमा असलेल्या पाच व्यक्तींचा समावेश असल्याचे फडणवीस यांनी सांगितले. समितीने विद्यार्थ्यांशी प्रत्यक्ष संवाद साधून त्यांच्या अनुभवातून परीक्षा व्यवस्थेतील त्रुटी आणि 'लूप-होल्स' समजून घ्यावेत, अशी सूचना करण्यात आली आहे. १२ तारखेपासून पुण्यासह विविध विभागीय स्तरांवर समिती विद्यार्थ्यांशी संवाद साधणार असून, विद्यार्थ्यांनी आपापल्या विभागात समितीसमोर आपल्या सूचना आणि अडचणी मांडाव्यात, असे आवाहन मुख्यमंत्र्यांनी केले. 'प्रेफरन्स' पद्धतीबाबत विद्यार्थ्यांनी मांडलेला मुद्दाही समितीसमोर ठेवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. तीन वेगवेगळ्या परीक्षा देऊन निवडीची प्रक्रिया लांबत राहिल्याने विद्यार्थ्यांची दोन-तीन वर्षे जातात. त्यामुळे ही पद्धत बदलण्याचा मुद्दा योग्य असून, त्याचे फायदे-तोटे तपासून समितीने शिफारस करावी, असे फडणवीस यांनी सांगितले.

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांनी स्वतः मूर्ती घडवून दिला पर्यावरण संवर्धनाचा संदेश

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे प्रतिपादन

## गणेशोत्सव पर्यावरणपूरक पद्धतीने साजरा करण्याची जबाबदारी आपल्या सर्वांचीच

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे : गणेशमूर्तीच्या भव्यतेपेक्षा भक्ती आणि पर्यावरण संवर्धनाला अधिक महत्व असून, गणेशोत्सवासारखा सांस्कृतिक वारसा जपणारा सण पर्यावरणपूरक पद्धतीने साजरा करणे, ही आपल्या प्रत्येकाची जबाबदारी आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

वाशी येथील सिडको एक्झिबिशन अँड कन्व्हेन्शन सेंटरमध्ये आयोजित 'पर्यावरणपूरक महा गणेश मूर्ती कार्यशाळा २०२६' मध्ये ते बोलत होते. या भव्य कार्यशाळेत एकाच वेळी तब्बल १० हजारांहून अधिक विद्यार्थ्यांनी शाडूच्या मातीपासून पर्यावरणपूरक गणेशमूर्तींची निर्मिती करून 'गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड'मध्ये महाराष्ट्राच्या नावावर नवा जागतिक विक्रम नोंदवला.

या ऐतिहासिक सोहळ्याला पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री पंकजा मुंडे, वनमंत्री गणेश नाईक, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अध्यक्ष सिद्धेश कदम, आमदार मंदा म्हात्रे, आमदार रवींद्र फाटक, पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाच्या सचिव जयश्री भोज, नवी मुंबईच्या महापौर सुजाता पाटील, नवी मुंबई महानगरपालिका आयुक्त कैलास शिंदे, ठाण्याचे जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ आणि कला संचालनालयाचे संचालक डॉ. नितीन इंगळे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी उपस्थितांना संबोधित करताना सांगितले की, गणराया ही बुद्धीची देवता असून आपल्या संस्कृतीत पर्यावरणाला अनन्यसाधारण महत्व आहे. सृष्टीची निर्मिती करणाऱ्या पंचमहाभूतांचे रक्षण झाले तरच मानवी जीवन सुरक्षित राहू शकते. मोठ्या गणेशमूर्ती, प्लास्टर ऑफ पॅरिस आणि कृत्रिम रंगांमुळे जलस्रोतांचे होणारे नुकसान टाळण्याचे आवाहन करताना ते म्हणाले की, मूर्ती लहान असो वा मोठी, भक्ती सारखीच असते. ईश्वराचा आशीर्वाद हा मूर्तीच्या आकारावर



नव्हे, तर आपण पर्यावरण आणि समाजाची किती निस्वार्थ सेवा करतो यावर ठरतो. गिनीज वर्ल्ड रेकॉर्डच्या परीक्षकांनी निकाल जाहीर करताच मुख्यमंत्र्यांनी या यशाचे खरे शिलेदार सहभागी विद्यार्थी असल्याचे सांगत त्यांचे कौतुक केले. तसेच पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे, पर्यावरण विभाग, जे. जे. स्कूल ऑफ आर्ट आणि कला संचालनालयाच्या प्रयत्नांची विशेष प्रशंसा केली. पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांनी विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन करताना सांगितले की, शाडू मातीपासून बाप्पा घडवणाऱ्या या हजारो विद्यार्थ्यांनी स्वतःला 'वसुंधरा रक्षक' म्हणून सिद्ध केले आहे. संस्कृती जपत पर्यावरण रक्षणाचा हा संदेश घराघरात पोहोचविणे हाच या उपक्रमाचा मूळ हेतू आहे. ढोल-ताशांच्या मंगल गजरात आणि मूर्तिकारांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण परिसर भक्तिमय झाला होता. या कार्यशाळेचे मुख्य आकर्षण ठरले ते म्हणजे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांनी स्वतः शाडू माती हातात घेऊन गणेशमूर्ती साकारली. राज्याच्या सर्वोच्च नेतृत्वाला आपल्यासोबत मूर्ती घडवताना पाहून विद्यार्थ्यांचा उत्साह शिगेला पोहोचला. आपण स्वतः करू शकतो तर प्रत्येक कुटुंबही पर्यावरणपूरक बाप्पा साकारू शकते, असा ठाम आणि प्रत्यक्ष कृतीतून दिलेला संदेश या उपक्रमाने संपूर्ण समाजाला दिला. शाळा-महाविद्यालयांचे विद्यार्थी, कला क्षेत्रातील तज्ज्ञ, प्राध्यापक आणि हजारो गणेशभक्तांच्या साक्षीने हा जागतिक विक्रम आणि पर्यावरण संवर्धनाचा जागर अत्यंत दिमाखात संपन्न झाला.

# शिक्षकांनी ज्ञान, विचार व कृतीतून समाजासमोर आदर्श निर्माण करावा : नानासाहेब लिगाडे

## कर्मवीर भाऊराव पाटील स्वायत्त महाविद्यालयात शिक्षक सन्मान सोहळा उत्साहात

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

पंढरपूर : येथील रयत शिक्षण संस्थेच्या कर्मवीर भाऊराव पाटील स्वायत्त महाविद्यालयात समारंभ समिती व सेवक कल्याण समिती यांच्या संयुक्त विद्यमाने शिक्षक दिनानिमित्त शिक्षक सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. टी. जाधव होते. प्रमुख पाहुणे म्हणून नानासाहेब लिगाडे उपस्थित होते.

कार्यक्रमास रयत शिक्षण संस्थेच्या जनरल बॉडीचे सदस्य जे. बी. धायगुडे, डॉ. राजेंद्र जाधव, अमरजीत पाटील, सेवानिवृत्त प्राचार्य डॉ. दादासाहेब साळुंखे, डॉ. बजरंग शितोळे यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी भारतरत्न डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन, कर्मवीर भाऊराव पाटील व रयत माऊली सौ. लक्ष्मीबाई पाटील यांच्या प्रतिमांना मान्यवरांच्या हस्ते पुष्पांजली अर्पण करून अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सेवक कल्याण विभागाचे चेअरमन प्रा. डॉ. उमेश साळुंखे यांनी केले.

यावेळी मार्गदर्शन करताना प्रमुख पाहुणे नानासाहेब लिगाडे म्हणाले की, रयत शिक्षण संस्था ही महाराष्ट्रातील नावलौकिक प्राप्त संस्था असून सेवक, शिक्षक यांच्या त्याग, श्रम, कष्ट व योगदानातून तिची उभारणी झाली आहे. शिक्षक आपल्या विचार, वर्तन, चालणे-बोलणे आणि कृतीतून विद्यार्थ्यांसमोर आदर्श निर्माण करतात. स्वाभिमानी शिक्षक विद्यार्थ्यांच्या कायम स्मरणात राहतात.

रयत शिक्षण संस्थेचा विद्यार्थी आणि शिक्षक असणे हा आपल्या जीवनातील मोठा गौरव असल्याचे सांगून लिगाडे यांनी शिक्षण व्यवस्थेतील बदलांवर भाष्य केले. अमेरिका, इस्राईल आणि भारतातील शिक्षण पद्धतींची तुलना करताना मातृभाषेतून शिक्षण देणे हा आदर्श शिक्षणाचा मूलभूत सिद्धांत आहे, असे त्यांनी स्पष्ट केले. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी सुरू केलेली 'कमवा व शिका' योजना आज जगातील विविध शिक्षण व्यवस्थांमध्ये विविध स्वरूपात राबविली जात असल्याचे त्यांनी नमूद केले. रयत शिक्षण संस्थेने गुणवत्ता वृद्धिंगत करण्यासाठी 'रयत गुणवत्ता विकास आराखडा' तयार केला असल्याचेही त्यांनी सांगितले.



अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना प्राचार्य डॉ. बी. टी. जाधव म्हणाले की, शिक्षक हा एक व्रत घेऊन आपले कर्तव्य बजावत असतो. विद्यार्थी हा शिक्षण प्रक्रियेचा केंद्रबिंदू असून त्याच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास करण्याबरोबरच मानवी, सामाजिक व जीवनमूल्यांची रुजवणूक करणे हे शिक्षकांचे महत्त्वाचे कार्य आहे.

रयत शिक्षण संस्था हे एक कुटुंब असून या कुटुंबातील सेवानिवृत्त शिक्षकांना पुन्हा महाविद्यालयात आमंत्रित करून त्यांचा सन्मान करणे ही आनंदाची व अभिमानाची बाब असल्याचे त्यांनी सांगितले. ज्या देशातील शिक्षक आधुनिक व पुरोगामी विचारांचे असतात, तोच देश प्रगतीच्या उंच शिखरावर पोहोचतो. समाजाची व विद्यार्थ्यांची गरज ओळखून समाज सक्षमीकरणासाठी शिक्षकांनी योगदान द्यावे, असे आवाहन त्यांनी केले.




यावेळी महाविद्यालयातून सेवानिवृत्त झालेले प्राचार्य डॉ. मधुसूदन बचुटे, आप्पा पाटील सर, डॉ. भगवान नाईक नवरे, डॉ. एन. एन. तंटक, डॉ. विकास कदम, डॉ. कांतीलाल बागल यांच्यासह अनेक रयत सेवकांचा सन्मान करण्यात आला. कार्यरत शिक्षकांचाही पेन, डायरी व गुलाबपुष्प देऊन सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. सारिका भांगे व प्रा. रोहिणी बावचकर यांनी केले, तर महेश कोंडूभैरी यांनी उपस्थितांचे आभार मानले. कार्यक्रमास महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नळदुर्ग येथे बनसोडे परिवाराकडून कन्या रत्नाचे हर्षउल्हाशी आनंदी वातावरणात थाटामाटात स्वागत

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

वागदरी/एस.के.गायकवाड : तुळजापूर तालुक्यातील भीम नगर नळदुर्ग येथील बनसोडे परिवाराकडून कन्या रत्नाचे हर्ष उल्हासात आनंदी वातावरणात मोठ्या थाटामाटात स्वागत करण्यात आले असून हा एक आगळा वेगळा उपक्रम समाजाला प्रेरणा देणारा आहे.

याबाबत माहिती अशी की रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे (आठवले) चे जिल्हा उपाध्यक्ष बाबासाहेब दुष्यंत बनसोडे राहणार भिमनगर नळदुर्ग ता.तुळजापूर यांचे द्वितीय सुपुत्र प्रशिक उर्फ भैय्या बाबासाहेब बनसोडे व सूनबाई निकिता उर्फ पायल यांना दि.३१ ऑगस्ट २०२६ रोजी कन्या रत्न झाले.

लातूर येथील दवाखान्यामध्ये डिलिव्हरी करण्यात आली. त्यावेळी त्यांना कन्यारत्न जन्मास आले असून आठ दिवस दवाखान्यातील



उपचार घेऊन आई व बाळाला दि.८ सप्टेंबर २`२६ रोजी नळदुर्ग येथे त्यांच्या राहत्या घरी आणण्यात आले.यावेळी बनसोडे परिवाराकडून रांगोळी घालून फुलांचे डेकोरेशन करून आजी आजोबा आई-वडील काका काकी या सर्व परिवाराने त्या कन्यारत्नाचे आनंदी आणि उत्साही वातावरणा मध्ये स्वागत करून कन्या रत्नाच्या जन्माचा आनंद उत्सव साजरा केला.



मुळातच बनसोडे परिवाराला बुद्ध-फुले-शाहू- आंबेडकर चळवळीचा वारसा लाभलेला असून बाबासाहेब बनसोडे हे रिपब्लिकन चळवळीत निष्ठेने काम करतात तर दादासाहेब बनसोडे हे भारतीय बौद्ध महासभेच्या माध्यमातून बौद्ध धम्माचा प्रसार आणि प्रचार करण्याचे प्रामाणिकपणे आणि निष्ठेने काम करतात आंबेडकरी चळवळीमध्ये ते सक्रिय आहेत.नळदुर्ग आणि परिसरातील एकमेक प्रमाणित बौद्धाचार्य म्हणून त्यांची ओळख आहे. त्यांचे वडील स्मृतीशेष दुष्यंत बनसोडे हे तत्कालीन नळदुर्ग नगरीचे सलग पंधरा वर्षे नगरसेवक म्हणून जनतेची सेवा केलेली आहे.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या संकल्पनेतील रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया या पक्षाच्या माध्यमातून त्यांनी स्वतंत्र हत्ती या पक्षाच्या चिन्हावर निवडणुका लढवून त्या जिंकले आहेत. त्यांच्यामुळे या घराण्याला सामाजिक चळवळीचा वारसा लाभलेला आहे. अशा या कुटुंबामध्ये प्रशिक उर्फ भैया आणि निकिता उर्फ पायल यांच्या पोटी कन्यारत्न जन्मास आले. ही एक आभिनंदनीय बाब आहे.

आपण बघतोय आजही मुलीच्या जन्माबाबत नाराजी व्यक्त केले जाते.मुलगी नको म्हणून अनेक वेळा स्त्री भ्रूणहत्या होताना दिसत आहेत.त्यामुळे मुलीच्या जन्माचे प्रमाण ही घटत चालले आहे. निसर्गाचे संतुलन राखण्यासाठी मुला बरोबरचं मुलीची ही तितकीच गरज आहे.मुलीच्या जन्माचे प्रमाण कमी होताना दिसून येत आल्याचे लक्षात येताच शासनाने स्त्री भ्रूणहत्या विरोधी कायदा केला आहे. बेटी बचाव बेटी पढाव असा नारा देत मुलीचा सन्मान करण्याचे आवहान शासनाकडून केले जात आहे मुलापेक्षा मुलगी बरी प्रकाश देते दोन्ही घरी असं म्हटलं जातं आणि अशा वातावरणा मध्ये बनसोडे परिवारांनी मात्र कन्यारत्न जन्माचे आनंदाने उत्साहाने स्वागत करून समाजाला एक वेगळी दिशा देण्याचं, प्रेरणादायी काम केलं आहे. त्याबद्दल त्यांच्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक केले जात आहे.



# नंगपुरामुर्री शासकीय निवासी शाळेचा लोकनृत्यात प्रथम क्रमांक

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

गोंदिया : तालुक्यातील नंगपुरामुर्री येथील अनुसूचित जाती व नवबौद्ध मुलांची शासकीय निवासी शाळेचा जिल्हास्तरीय लोकनृत्यात प्रथम क्रमांक पटकावला आहे. सदर शाळेची चमू ही विभागीय स्तरावर सादरीकरण करणार आहे.



राष्ट्रीय लोकसंख्या शिक्षण प्रकल्प २०२६-२७ अन्वये भूमिका अभिनय व लोकनृत्य स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. छझएझ, छउएठढ, नवी दिल्ली यांचा मान्य कृती आराखडा म्हणून संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे द्वारा भूमिका अभिनय व लोकनृत्य या दोन्ही स्पर्धा जिल्हास्तर, विभागस्तर, राज्यस्तर व राष्ट्रीय स्तरावर नियोजित आहेत.

**विभागीय स्तरावर करणार सादरीकरण : जिल्हास्तरीय लोकनृत्य स्पर्धा**

या सादरीकरण चमूमध्ये क्रिश जनबंधू, राजविर वासनिक, स्नेहिल शहारे, दिपांशू मोटघरे, वैभव बोंबार्डे, समीर खोब्रागडे यांचा सहभाग होता. जिल्हास्तरीय विजेत्या चमूचे अभिनंदन शाळेचे मुख्याध्यापक रविशंकर ईठूले, प्रदीप ढवळे, नीता भलमे, पुष्कराज लांजेवार, साधना पारधी, आशिष शहारे, निशा गभणे, दीक्षा तुरकर, मुन्नाभाई नंदागवळी, कार्तिक शहारे, तुषार महाजन यांनी शुभेच्छा दिल्या.

# महिला पदाधिकारींच्या वतीने ग्रामीण आमदारांचा सत्कार

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

लातूर : प्रतिनिधि सुधाकर रणदिवे, महाराष्ट्र पोलीस मित्र सोशल असोसिएशनच्या महिला पदाधिकारी यांच्या वतीने ग्रामीण भागातील दुर्गम प्रश्नांना वाचा फोडण्याचे काम करणारे लातूर ग्रामीण चे विद्यमान आमदार रमेश आप्पा कराड साहेब यांचा सत्कार महिला पदाधिकारी यांच्या वतीने करण्यात आला.



यावेळी संस्थापक सचिव डॉ.सुफी सय्यद शमशोद्दीन, प्रदेश सचिव सहारा शेख, प्रदेश संघटक सुरेखा घोडके, प्रदेश कार्याध्यक्ष उषाताई धावारे, मराठवाडा अध्यक्षा गंगासागर ढवळे, लातूर जिल्हा अध्यक्षाजान्हवी सोनसळे, जिल्हा सहसचिव कुसुम थोरे, शहर कार्याध्यक्ष प्रिती टेंकाळे, तालुका उपाध्यक्ष अश्विनी शिंदे, फुलाबाई सोणवणे,समरिन पठाण, प्रियंका गायकवाड, तालुका संपर्क प्रमुख रुपाली खंगले, जिल्हा कार्याध्यक्ष संगीता कांबळे, उपस्थित होते.

यावेळी ग्रामीण भागातील विविध विषयांवर चर्चा करण्यात आली.

**राज्यस्तरीय स्व राम उगावकर पुरस्कार प्रदान सोहळा संपन्न**

# वैचारिक समृद्धी वाचनालयातून निर्माण होते : कवी अरविंद जगताप

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

निफाड/प्रतिनिधी - शताब्दी पूर्ण केलेल्या आणि राज्याच्या ज्ञानसाधनेची खुण असलेल्या न्यायमुर्ती रानडेंच्या जन्मस्थळी श्री माणकेश्वर वाचनालयाची दिमाखदार इमारत उभी राहिली आहे.न्यायाधिष्ठित कायद्याचे राज्य,सामाजिक समता,दीन दुबळ्यांना न्याय असे उदारमतवादी धोरण न्यायमुर्ती रानडेंनी अंगिकारले होते.ग्रंथालये निर्माण होऊन माणसे वैचारिक समृद्ध केली जातात असे प्रतिपादन निफाड येथील १०७ वर्ष पूर्ण केलेल्या श्री माणकेश्वर वाचनालयाने आयोजित केलेल्या राज्यस्तरीय स्व.राम उगावकर स्मृती पुरस्कार व गुणवंत विद्यार्थी सत्कार सोहळ्याप्रसंगी गीतकार अरविंद जगताप यांनी केले.

याप्रसंगी व्यासपीठावर निफाडचे आमदार दिलीप बनकर,पुरस्कारार्थी सुप्रसिद्ध लेखक, सीने गीतकार अरविंद जगताप, सुप्रसिद्ध साहित्यिक सनदी अधिकारी बी.जी. वाघ,वि. दा. व्यवहारे, लासलगाव कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक राजेंद्र डोखळे, उपनगराध्यक्ष अनिल कुंदे, पुणे विद्यापीठाचे सिनेट सदस्य सागर वैद्य, वाचनालयाचे अध्यक्ष मधुकर शेलार, नाशिक जिल्हा कांदा बटाटा संघाचे चेअरमन बापूसाहेब कुंदे, कल्याणी नागरी पतसंस्थेच्या चेअरमन अंजली उगावकर, ज्येष्ठ नेते शिवाजी ढेपले, नगरसेवक देवदत्त कापसे, काँग्रेसचे तालुकाध्यक्ष साहेबराव ढोमसे, भाऊसाहेब कापसे, इरफान सय्यद,करण विधाते, उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक राजीव तांभाळे आदी मान्यवर होते.

त्यानंतर निफाडचे आमदार दिलीप बनकर, सनदी अधिकारी बी.जी.वाघ यांनी वाचनालयात होत असलेले उपक्रम,वाचनालयाची समृद्ध ग्रंथसंपदा,इमारत आदींसह विविध बाबींबाबत गौरवोद्गार काढले.

यावेळी पुरस्कारार्थी कवी अरविंद जगताप यांना कार्यक्रमाचे अध्यक्ष आमदार दिलीप बनकर,सनदी अधिकारी बी. जी. वाघ यांच्या हस्ते दहा हजार रुपये व मानपत्र असे देऊन गौरविण्यात आले.

पुढे बोलतांना पुरस्कारार्थी अरविंद जगताप यांनी कालात्मक उंचीचे गाणं लिहिल्यावर खूप मोठा आनंद मिळतो,असे सांगून आपले कुठल्यातरी जन्माचे किंवा जिव्हाळ्याचे नाते असेल म्हणूनच तुम्ही मला पुरस्कार दिला असे बोलून कृतज्ञता व्यक्त केली,

यावेळी गुणवंत विद्यार्थी व सेवानिवृत्त शिक्षक संदीप चकोर, सुभाष खाटेकर, सीमा सोनवणे आदी शिक्षकांचे सेवानिवृत्तीनिमित्त वाचनालयाच्या वतीने सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी वाचनालयाचे अध्यक्ष मधुकर शेलार,उपाध्यक्ष डॉ. मेघा

जंगम, चिटणीस सुनील चिखले,सहचिटणीस राहुल दवते, हिशोब तपासणीस दत्ताकाका उगावकर, संचालक तन्वीर राजे,सुहास सुरळीकर, ग्रंथमित्र नईमखान पठाण,डॉ. महेश बनकर, विजय धारराव, गुलाब टकले, डॉ.अरुण कातकाडे, शाम गोळे यांसह माजी नगरसेवक दिलीप कापसे,विकास जाधव, पुंजाआप्पा तासकर,भाऊसाहेब शिंदे,ऍड श्रीकांत रायते, डॉ. उत्तम डेरले,डॉ. रोहित धोक्रट, ओंकार मोगल, संजय धारराव, भाऊसाहेब शिंदे, जावेद मणियार, ज्ञानेश्वर मोगल, संजय बोरगुडे, बाबासाहेब सोमवंशी, दत्तू बागडे, अशोक पगारे, संजय घुमरे, सचिन गडकरी, सुरज कुंदे, पुंडलिक घोलप, सचिन जाधव, संजय सुरळीकर, शाम शिंदे, तुषार देवरे, राजाबाबू होळकर, भरत आव्हाड, राजाभाऊ सोमवंशी, शंकर



हिंगमिरे, विलास कर्वे, अनिल कुंभार्डे, सचिन शर्मा,राहुल नागरे,राजेश लोखंडे, सुभाष खाटेकर, सुरेश कुंदे, गौरव व्यवहारे, नारायण भांडारकर, अन्वर शेख,अण्णापाटील बोरगुडे, माणिक देसाई, संतोष गिरी, राजेंद्र थोरात,ग्रंथपाल नितीन बनसोडे, सहाय्यक ग्रंथपाल आरती जंगम, लेखनिक नंदकुमार पुंड, अनिता इस्ते आदींसह सभासद,वाचक उपस्थित होते.कार्यक्रमाचे प्रास्ताविक अध्यक्ष मधुकर शेलार, सूत्रसंचालन सुहास सुरळीकर तर आभार सुनील चिखले यांनी मानले.

# वंजारवाडी म्हारळ जिल्हा परिषद शाळेत स्लॅब कोसळला; विद्यार्थी थोडक्यात बचावले!

## विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा गंभीर प्रश्न; नवीन इमारत उभी करण्याची मागणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

प्रतिनिधी बाळासाहेब अहिरे म्हारळ : जिल्हा परिषद शाळा वंजारवाडी, म्हारळ येथे शाळेच्या इमारतीचा स्लॅब अचानक कोसळल्याची धक्कादायक घटना घडली. सुदैवाने या घटनेत विद्यार्थी थोडक्यात बचावले असून मोठी दुर्घटना टळली आहे.

शाळेच्या इमारतीची अवस्था चिंताजनक असल्याचे या घटनेतून समोर आले आहे. स्लॅब कोसळल्यामुळे विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला असून, भविष्यात मोठी दुर्घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही.

शाळेच्या इमारतीची तातडीने पाहणी करून धोकादायक भागाची दुरुस्ती किंवा आवश्यक असल्यास नवीन इमारत उभारावी, अशी मागणी पालक व नागरिकांकडून होत आहे.

विद्यार्थ्यांच्या जीविताशी संबंधित हा गंभीर प्रश्न असल्याने संबंधित शिक्षण विभाग व जिल्हा परिषद प्रशासन याकडे तातडीने लक्ष देणार का, असा सवाल आता उपस्थित केला जात आहे.






# बार्टीच्या वतीने वृक्षारोपण पंधरवडा साजरा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सामाजिक न्याय विशेष सहाय्यक विभाग व डॉ बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था वृक्षारोपण कार्यक्रम घेण्यात आला सदरची ही संकल्पना मा.महासंचालक दिपा मुधोळ मॅडम व निबंधक सुचिता शिंदे मॅडम यांच्या संकल्पनेतून व मा. विभागप्रमुख मा. बबन जोगदंड सर व सहाय्यक आयुक्त मा.सुलोचना सोनवणे मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली संबंध जिल्हा मध्ये पंधरवडा साजरा करण्यात येत आहे याचेच औचित्य साधुन आज

श्री तारामाता प्रशाला अक्कलकोट येथे मुख्याध्यापिका श्रीमती सोनाली सुतार व बार्टीचे सौ . नालंदा चंदनशिवे यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.



पर्यावरणाचा समतोल राखणे आणि विद्यार्थ्यांमध्ये निसर्गाविषयी प्रेम निर्माण करणे हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश होता.य यावेळी शाळेच्या मैदानावर आणि परिसरामध्ये नीम, सिताफळ, पिंपळ, आणि चिंच यांसारख्या विविध छायादार व औषधी रोपांची लागवड करण्यात आली. विद्यार्थ्यांनी व शिक्षकांनी मिळून जवळपास १० रोपांची लागवड केली आणि त्यांच्या संगोपणाचा संकल्प केला.

सदर कार्यक्रमास शाळेतील शिक्षक जयश्री पवार, प्रशांत मोरे, वाडीकर मकबूल, बोराडे विनायक व शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

# गोकुळ अष्टमी व बैल पोळा उत्सव निमित्त श्री विठ्ठलास पारंपरिक सुवर्ण अलंकार परिधान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : गोकुळ अष्टमी व बैल पोळा उत्सव निमित्त श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात श्री विठ्ठलास आकर्षक व पारंपरिक सुवर्ण अलंकारांनी अलंकृत करण्यात आले. पारंपरिक अलंकारांनी सजलेले श्री विठ्ठलाचे विलोभनीय रूप पाहण्यासाठी तसेच दर्शनासाठी मंदिरात भाविकांची मोठ्या प्रमाणात गर्दी होत आहे.





गोकुळ अष्टमी व बैल पोळा उत्सव निमित्त श्री विठ्ठलास सोन्याचा मुकुट, मोत्याचा तुरा, नाम हिऱ्याचा,कौस्तुभ मणी,दंडपेट्यात जोड मोठा, हिऱ्याचे कंगनजोड, मोत्याची कंठी दोन पदरी, शिरपेच लहान, शिरपेच मोठा, मस्त्य जोड, लक्ष्मी हार, अष्टपैलू मण्याची कंठी तीन पदरी, तांदळा हार सात पदरी, एकदानी, पुतळ्यांची माळ, मोहरांची माळ, तुळशीची माळ एक पदरी, तोडेजोड आदी पारंपरिक व मौल्यवान अलंकार परिधान करण्यात आले.

गोकुळ अष्टमी व बैल पोळ्याच्या पावन पर्वानिमित्त श्री विठ्ठलाचे हे मनोहारी रूप भाविकांच्या आकर्षणाचे केंद्र ठरले असून, भाविकांनी भक्तिभावाने श्री विठ्ठलाचे दर्शन घेतले.

याबाबतची माहिती समितीचे व्यवस्थापक प्रवीणकुमार घम यांनी दिली.

# भारत-पाक बॉर्डरचा राजा जम्मू-कश्मीरला रवाना

## सैनिकांसोबत साजरा होणार गणेशोत्सव; मुंबईहून पुंछ सीमावर्ती भागात साडेसहा फूटाची गणेशमूर्ती रवाना

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई,(केतन भोज);भारत-पाकिस्तान नियंत्रण रेषेवरील (ङजउ) पुंछ,जम्मू-कश्मीर येथील भारतीय जवानांसोबत गणेशोत्सव साजरा करण्यासाठी मुंबईहून साडेसहा फूट उंचीची श्री गणेशमूर्ती जम्मू-कश्मीरकडे रवाना होणार आहे.मानवाधिकार कार्यकर्त्या व प्राचीन शिव दुर्गा भैरव मंदिर,पुंछच्या ट्रस्टी ईशर दीदी यांच्या पुढाकाराने तसेच 'प्रोग्रेसिव्ह नेशन' संस्थेचे अध्यक्ष,स्वयंभू साल सिद्धेश्वर मंदिराचे ट्रस्टी आणि शिवनेरी सामाजिक प्रतिष्ठानचे अध्यक्ष छत्रपती आवटे (दादा) यांच्या सहकार्याने हा उपक्रम गेल्या १७ वर्षांपासून अखंडपणे राबविण्यात येत आहे

### दिव्यांग मूर्तिकार विक्रांत पांढरे यांच्या चित्रशाळेत साकारली बाप्पाची आकर्षक मूर्ती

यंदा मुंबईतील कुर्ला (पश्चिम) येथील इंडियन नेव्ही बेसच्या मुख्य प्रवेशद्वाराजवळ असलेल्या दिव्यांग मूर्तिकार विक्रांत पांढरे यांच्या चित्रशाळेत साडेसहा फूट उंचीची गणेशमूर्ती साकारण्यात आली आहे. ही गणेशमूर्ती रविवार, ६ सप्टेंबर २०२६ रोजी जम्मू-कश्मीरकडे रवाना होणार आहे. मुंबईहून स्वराज एक्सप्रेसने सुमारे २,००० किलोमीटरचा प्रवास करून ही मूर्ती जम्मू रेल्वे स्थानकावर पोहोचेल. त्यानंतर ट्रकद्वारे सुमारे ३०० किलोमीटरचा दुर्गम व पर्वतीय मार्ग पार करत पुंछ येथील भारत-पाकिस्तान एलओसीजवळील गावात गणेशमूर्ती नेण्यात येणार आहे

### जवानांसाठी गणेशोत्सव ठरतो आध्यात्मिक आधार

सीमेवर अत्यंत प्रतिकूल हवामान, घनदाट जंगल, बर्फाळ नद्या आणि सुरक्षेची आव्हाने यांचा सामना करत भारतीय जवान देशसेवा बजावत आहेत. अनेक जवानांना आपल्या कुटुंबीयांसोबत सण साजरे करण्यासाठी घरी जाता येत नाही

अशा परिस्थितीत सीमावर्ती भागात उभारला जाणारा बाप्पांचा मंडप जवानांसाठी कुटुंबासारखा आधार ठरतो. जवान भक्तिभावाने गणेशोत्सवात सहभागी होतात, असे आयोजकांनी सांगितले.

### प्रोग्रेसिव्ह नेशन्स एनजीओ'ची स्थापना

ईशर दीदी यांच्या परिवारातील अनेकजण देशासाठी शहीद झाले आहेत त्यामुळे शहीद झालेल्याच्या भावना काय असतात त्या चांगल्या प्रकारे त्यांना माहिती आहेत त्यामुळेच त्यांनी प्रोग्रेसिव्ह नेशन्स एनजीओ'ची स्थापना केली.

### पुंछमध्ये विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रम



गणेशोत्सवादरम्यान पुंछ येथे पहाटेपासून विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. सायंकाळी ७ वाजता जवानांच्या उपस्थितीत श्रींची आरती केली जाते. गणेशभक्तांकडून दररोज विविध प्रसादांचे वाटप करण्यात येते. अनंत चतुर्दशीच्या दिवशी शेरे-ए-कश्मीर पुलाजवळील पुलस्त नदीमध्ये श्री गणेशमूर्तीचे विसर्जन करण्यात येते.

### विद्यार्थ्यांच्या कलागुणांना प्रोत्साहन

या उपक्रमांतर्गत 'एका सैनिकाची आत्मकथा' या विषयावर चित्रकला आणि निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांमध्ये देशप्रेम, त्यागाची भावना आणि भारतीय सैनिकांबद्दल आदर निर्माण करणे हा या स्पर्धेचा मुख्य उद्देश होता. स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थ्यांना ट्रॉफी, भेटवस्तू आणि प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. तसेच सहभागी विद्यार्थ्यांनाही प्रोत्साहनपर भेटवस्तू व प्रमाणपत्रे देण्यात आली. विद्यार्थ्यांनी तयार केलेली चित्रे आणि निबंध सीमावर्ती भागातील गणेशोत्सवाच्या ठिकाणी प्रदर्शनासाठी लावण्यात येणार आहेत.

